# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

दिनांक १५.०४.२०२६ बुधवार

(गुन्हे)

**१) सोनेगाव पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक १४.०४.२०२६ चे १२.५० वा. चे सुमारास, सोनेगाव पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, राहूलनगर, मनपा शाळेजवळ एक इसम शस्त्रासह फिरत आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसुन आल्याने त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहून पळू लागला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. इसमास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सागत सुधाकर नारनवरे वय ३३ वर्षे, रा. राहूलनगर झोपडपट्टी, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे जिन्सपॅन्टचे आत कमरेत एक लोखंडी चाकु किंमती ३००/—रू. चा मिळाल्याने जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. १०/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सोनेगाव येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का., सहकलम ४, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. १, मा. श्री सतिशकुमार गुरव, सहायक पोलीस आयुक्त (सोनेगाव विभाग), वपोनि नितीन मगर, पोलीस ठाणे सोनेगाव यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि विक्रांत कारटकर, पोहवा मंगेश गाडगे, राजेश व दिनेश यांनी केली आहे.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे गिटटीखदान :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, जाफरनगर, सुरी ले आऊट, ४/डी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी पाशु अहमद खान वय ५१ वर्षे हे आपले परिवारासह नातेवाईकाचे लग्नाला गेले होते. घरी परत येऊन लग्नात घातलेले सोन्याचे दागिने काढून कपाटात ठेवले होते. दिनांक १३.०४.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १४.०४.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मागील उघडे दारातून आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख २५,०००/— रु. व सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,३७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. गोपाल राऊत ८६९८११६६९५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.०४.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे रमेश चरणदास भगत वय ७४ वर्ष रा. पेठ बुधवार, ता. काटोल, जि. नागपूर हे पायदळ वैशालीनगर चौकातून मिलींदनगर येथे त्यांचे आतेभावाकडे जात असता, स्कुटी क्र. एमएच ४९ सीपी ८४७४ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांना धडक देवुन गंभीर जखमी केले. जखमी फिर्यादीचे वडीलांना उपचाराकरीता समर्पण हॉस्पिटल व तेथून मेडीकल हॉस्पिटल, वार्ड क्र. ५१ येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक १४.०४.२०२६ चे १६.१५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी फिर्यादी सुजित रमेश भगत वय ३१ वर्षे, रा. रा. पेठ बुधवार, ता. काटोल, जि. नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे सपोनि खंडारे ९२८४९२५४८४ यांनी स्कुटी चालकाविरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे बजाजनगर :—** दिनांक ११.०४.२०२६ चे २३.५३ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत, आयटीआय कॉलेजचे समोर रोडवर एक अनोळखी **इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे** वयाचे, रंग—निमगोरा, डोक्याचे केस—काळे, चेहऱ्यावर लांब दाढी, अंगात कत्था पांढऱ्या रंगाचे चौकडीचे शर्ट व पॅन्ट घातलेला, अशा वर्णनाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे वार्ड क्र. ५२ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १४.०४.२६ चे २०.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे सपोनि शिवाजी काठे ७०२१४०९५०० यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे

**२) पोलीस ठाणे जुनी कामठी :—** दिनांक १५.०४.२०२६ चे ०९.२० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत, जयस्तंभ चौक, हुतात्मा स्मारक कंपाऊंडचे आत, कामठी येथे एक अनोळखी **ईसम वय अंदाजे ५०** वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत पडलेले आहेत, अशा माहीतीवरून पोलीसांनी तेथे जावुन त्यांना उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय, कामठी येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतक इसमाची ओळख पटलेली नसुन, वर्णन पुढील प्रमाणे— वर्णन रंग सावळा, बांधा सडपातळ, चेहरा लांबट, उंची ५ फुट ५ इंच, डोक्याचे केस पांढरे, दाढी—वाढलेली, अंगात काळ्या रंगाचे टिशर्ट व निळया रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. वरील वर्णनाचे इसमांस ओळखनाऱ्यांनी पोलीस ठाणे जुनी कामठी येथे संपर्क साधावा.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे जुनी येथे मपोउपनि. दिक्षा ताजने ७७०९७६९६६२ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :—** चंद्रशेखर भिमराव पगारे वय ४९ वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, गल्ली क्र. ३, नागपूर हे दिनांक ०९.०४.२०२६ रोजीपासून पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतून बेपत्ता आहेत, आजपावेतो घरी

परत आलेले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आलेले नाहीत. **वर्णन** रंग– निमगोरा, चेहरा–गोल, बांधा– मजबुत, केस– काळे. भाषा–मराठी व हिंदी बोलतात.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :–** कु. चहक भवन नागपुरे वय १५ वर्षे, रा. प्लॉट क्र. १८, पीएम आवास योजना समोर, तरोडी, वाठोडा, नागपूर ही दिनांक १२.०४.२०२६ चे सकाळी ०८.०० ते १८.०० वा. चे दरम्यान पोलीस ठाणे वाठोडा हद्दीतून राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेली, आजपावेतो घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा–गोल, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट, केस– काळे. भाषा–मराठी व हिंदी बोलते. सोबत निळया रंगाची शाळेची बॅग आहे.

**३) पोलीस ठाणे नंदनवन :–** मोहम्मद अर्शद मोहम्मद असलम अंसारी वय १९ वर्षे, रा. कादरीया मस्जिद जवळ, हसनबाग, नागपूर हा दिनांक १३.०४.२०२६ रोजीपासून पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणालाही काही न सांगता निघून गेला, आजपावेतो घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा–लांब, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ५ इंच, केस– काळे असून हिंदी भाषा बोलतो.


चंद्रशेखर


कु. चहक


मोहम्मद अर्शद

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | को.क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. २रे सहदिवाणी न्यायाधीश तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कामठी | १६१/२०१८ | कलम ८२ सीआरपीसी | सरफराज अंसारी वय १९ वर्ष रा. वारीसपुरा, कामठी, नागपूर | २१.०४.२०२६ |

स्वा/–
( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपूर शहर.